महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १५ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०८३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

# भिवंडी ते नवी मुंबई भूमिपुत्रांचा एल्गार

## विमानतळाला दि.बा. पाटलांच्या नामकरणासाठी खा. बाळ्यामामांच्या उपस्थितीत हजारो भूमिपुत्रांची रॅली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे/उरण** : माजी खासदार दिबा पाटील यांच्या जन्मशताब्दी व नवी मुंबई विमानतळाला नाव देण्याच्या मागणीसाठी रविवारी भिवंडीचे खासदार सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भिवंडी ते जासई अशी भव्य कार रॅली काढून जासईत नामकरणासाठी एल्गार करण्यात आला. या रॅलीची सांगता दिबांचे जन्मस्थान असलेल्या जासई येथे करण्यात आली. यावेळी झालेल्या मेळाव्यात दिबा हे देशव्यापी नेते होते. ज्यांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात कारावास, कूळ कायदा लागू करण्यासाठी परिश्रम घेणारे, ओ बी सा ना आरक्षण मिळविण्यासाठी विरोधी पक्ष नेतेपदाचा त्याग त्याग केला. स्त्री भ्रूण हत्या विरोधी कायदा महाराष्ट्रात



लागू करण्याचा पुढाकार झाला.

शेतकऱ्यांना साडेबारा टक्के आणि विकसित भूखंड देणारा कायदा देशासाठी लागू करण्यात आला आहे. यातून याच श्रेय ही दिबांचे आहे. त्यामुळे दिबा पाटील हे राष्ट्रीय नेते आहेत. या राष्ट्रीय नेत्यांच नाव नवी मुंबई विमानतळाला द्यावे अशी जोरदार मागणी केली. या रॅलीत रायगड, ठाणे, पालघर, मुंबई, नवी मुंबई या जिल्ह्यातील समाज हजारोच्या संख्येने उपस्थित होता. खासदार संजय दिना पाटील, आगरी समजा अध्यक्ष दशरथ पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, बाळाराम पाटील, राजू पाटील, भावना घाणेकर, संतोष केणे, राजेंद्र पाटील, संतोष घरत, सरपंच जासई, निलेश पाटील यांनी प्रास्ताविक केले. यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास दिबा पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीकडे केंद्र/राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

ही रॅली भिवंडी माणकोली, रेती बंदर खारीगाव, शीळ डोंबिवली कळवा नाका, ठाणे शहर आणि घोडबंदर रोड, दिघा रेल्वे स्थानका समोर (विटावा, आनंद नगर, दिघा, ऐरोली सिमेन्स कंपनी समोर (ऐरोली आणि दिवा ग्रामस्थ), रबाळे रेल्वे स्थानका समोर (रबाळे, गोठिवली, आणि तळवली ग्रामस्थ), मुलुंड ऐरोली मार्गे, घणसोली नाका (घणसोली ग्रामस्थ), रिलायन्स गेट (कोपरखैरणे आणि महापे ग्रामस्थ), कोपरी गाव हनुमान मंदिर (कोपरी, पावणे, बोनकोडे आणि जुहूगाव ग्रामस्थ), अरेंजा सर्कल वाशी (तुर्भे, सानपाडा, वाशी ग्रामस्थ), नेरूळ प्रशांत कॉर्नर सिग्नल (जुईपाडा, शिरवणे, सारसोळे, कूकशेत) करावे चाणक्य सिग्नल (नेरूळ, दारावे आणि करावे ग्रामस्थ), नवी मुंबई पालिका मुख्यालय (बेलापूर, शहाबाज, अग्रोली आणि दिवाळे ग्रामस्थ), दिबा पाटील विमानतळ रेतीबंदर गेट, चिंचपाडा ब्रिज खाली (चिंचपाडा आणि पनवेल ग्रामस्थ), मोठा ओवळा गाव (पारगाव ओवळा ग्रामस्थ), जासई लोकनेते दिबा पाटील मंगल कार्यालय येथे सभेने समारोप करण्यात आला.

### लक्षवेधी

## वायू प्रदूषण रोखण्यासाठी ठाणे मनपा अलर्ट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : बांधकामांच्या ठिकाणी होणारे हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी ठाणे महापालिका पुन्हा अलर्ट मोडवर आली आहे. मागील वर्षी काही बांधकाम व्यावसायिकांनी हवा प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळले नव्हते. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेच्या शहर विकास विभागाने त्यांना कामे थांबवण्याचे आदेश दिले होते. यंदाही १५ सप्टेंबरपासून पालिका पुन्हा अलर्ट मोडवर येणार असल्यामुळे शहरातील सर्व बांधकामस्थळांची तपासणी सुरू होणार आहे. नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई होईल, असा इशारा महापालिकेने दिला आहे उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार ठाणे महापालिकेला हवेची गुणवत्ता राखण्यासाठी २९ मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे बंधनकारक आहे. सध्या ठाणे शहरात सुमारे ३९० ठिकाणी बांधकाम सुरू आहे. अनेकदा निवासी व व्यावसायिक प्रकल्पांदरम्यान नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, ज्यामुळे शहरातील हवा प्रदूषित होते. मागील डिसेंबर व जानेवारी महिन्यात ठाण्यातील हवा गुणवत्ता निर्देशांक वाढल्याचे अनुभवास आले होते. महापालिकेने यापूर्वीच काही कडक नियमांची अंमलबजावणी केली आहे. यात प्रत्येक बांधकामस्थळी पत्र्याची भिंत उभारणे, जाळीचे आवरण बसविणे, बांधकाम साहित्य वाहून नेणाऱ्या वाहनांची चाके स्वच्छ करूनच बाहेर सोडणे, बांधकामस्थळी सातत्याने पाण्याची फवारणी करणे आणि संबंधित क्षेत्रात हवा प्रदूषण मोजणी यंत्रे बसविणे यांचा समावेश आहे.

## शहाड पूरग्रस्तांना मदत करा -भाजपा नेते मोहन कोनकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : गेल्या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शहाड परिसरातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. मात्र हे नागरिक अद्यापही शासनाच्या मदतीपासून वंचित असून या पूरग्रस्त नागरिकांना मदत करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीचे मोहने मंडळ प्रभाग क्रमांक १५ शहाडचे वार्ड अध्यक्ष मोहन कोनकर यांनी कल्याणच्या तहसीलदारांकडे पत्राद्वारे केली आहे.

ऑगस्ट महिन्यात २० आणि २१ तारखे दरम्यान सतत पडणाऱ्या पावसामुळे आलेल्या पुरात शहाड वार्ड क्रमांक १५ येथील बंदरपाडा, भालचंद्र नगर, खिमळी चाळ, अंबिका नगर, अवनी कॉम्पलेक्स, शहाड रोड जवळील दुकाने या सर्वांच्या घारात पुराचे पाणी शिरले होते. त्यामुळे नागरिकांचे खूप नुकसान झाले आहे. या सर्वांना मदत म्हणून नुकसान भरपाई देण्याची मागणी मोहन कोनकर यांनी कल्याणच्या तहसीलदारांकडे पत्राद्वारे केली आहे.

## अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विश्वास पाटलांची निवड



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**सातारा** : साताऱ्यामध्ये जानेवारीत होणाऱ्या 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत 'पानिपत'कार विश्वास पाटील यांच्या नावाची निवड झाली आहे. अध्यक्षपदाच्या शर्यतीत 'पानिपत'कार विश्वास पाटील 'कोसला'कार भालचंद्र नेमाडे, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठीच्या समितीचे अध्यक्ष रंगनाथ पठारे यांच्याही नावाची चर्चा होती. नेमाडे यांनी यापूर्वीच नकार दिला असल्याने विश्वास पाटील यांचे नाव अंतिम होणार असल्याची जोरदार चर्चा होती. आजच्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुण्यातील बैठकीत 'पानिपत'कारांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्षांची घोषणा केली. यंदा संमेलनाचं व्यासपीठ हे राजकीय व्यासपीठ होणार नाही याची काळजी घेऊ, वेगवेगळ्या दिवशी राजकीय नेते येतील यासाठी प्रयत्न करू असंही मिलिंद जोशी यांनी म्हटलं आहे.

साताऱ्यामध्ये होणाऱ्या 99 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडण्यासाठी पुण्यातील साहित्य परिषदेत आज सकाळी अकरा वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. साहित्य महामंडळाच्या वेगवेगळ्या शाखांकडून वेगवेगळ्या साहित्यिकांची नावे अध्यक्षपदासाठी सुचवण्यात आली होती. ज्यामध्ये रंगनाथ पठारे, विश्वास पाटील , बाळ फोंडके यांची नावे आघाडीवर होती. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलींद जोशी यांनी काही दिवसांपुर्वी भालचंद्र नेमाडे यांची देखील भेट घेऊन त्यांना अध्यक्षपदासाठी गळ घातली होती. मात्र नेमाडेंकडून प्रतिसाद मिळाला नाही. आजच्या बैठकीमध्ये विश्वास पाटील यांच्या नावावरती शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे.

## भारत-पाक सामन्यावरून राजकीय घमासान!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई/नवी दिल्ली

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान या शेजारील राष्ट्रांमधील संबंध विकोपाला गेल्यानंतर आता आशिया चषकातील साखळी सामन्यात भारत-पाक हे पारंपरिक प्रतिस्पर्धी रविवारी एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. याच लढतीवरून देशात राजकीय घमासान रंगले असून विरोधकांनी तसेच हल्ल्यात मृत झालेल्यांच्या नातेवाईकांनी या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, माजी क्रिकेटपटूंसहित अभिनेते, माजी लष्करी अधिकारी तसेच अनेक सेलिब्रेटींनीही या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची मागणी केली असून समाज माध्यमांवर सध्या 'बॉयकॉट इंडिया-पाक मॅच' हा ट्रेंड सध्या जोरात आहे. सामन्याच्या एक दिवसआधी देशभरात अनेक ठिकाणी याविरोधात निदर्शने केली जात आहेत.

दहशतवादी हल्ल्यात देशातील माता-भगिनींचे सिंदूर



मिटले. हल्ल्यातील रक्त अजून सुकलेले नाही, मग भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना कशाला हवा? असा सवाल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना विचारला. पाकच्या दहशतवादी कारवाया अजून सुरूच असून ऑपरेशन सिंदूर का थांबवले ? जर रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नसेल तर क्रिकेट आणि रक्त एकत्र का? त्यामुळेच भाजपने देशभक्तीच्या नावाखाली व्यापार केला. त्यामुळे निषेध म्हणून शिवसेनेच्या महिला रणरागिणी राज्यभरात आंदोलन करणार असून 'हर घर सिंदूर' जमा करून ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयात पोस्टाने पाठवणार आहेत, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांना फैलावर घेतले.

मे महिन्यात सीमेवर तणाव निर्माण झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात पहिलाच सामना दुबई येथे होत आहे. पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये घुसून २६ पर्यटकांची हत्या केली. आता त्याच कट्टर प्रतिस्पर्ध्यांमध्ये क्रिकेटच्या रणांगणात द्वंद्व होणार असल्यामुळे राजकीय टीका जोरात सुरू आहे. 'रक्त आणि क्रिकेट एकत्र वाहू शकतात का?,' असा सवाल शिवसेना ठाकरे गटाचे युवानेते तसेच आमदार आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. या सामन्याला परवानगी देणे म्हणजे पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील बळींच्या नातेवाईकांचा आणि कर्तव्य बजावताना हुतात्मा झालेल्या जवानांचा अपमान असल्याची टीका महाराष्ट्र काँग्रेसने केली आहे. तसेच ही सरकारची दुहेरी नीती आता जनतेसमोर आली आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मोदी-शहांवर टीका केली. 'आप'चे मुख्य नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनीही हा देशाशी विश्वासघात असल्याचे म्हटले आहे.










## फळेगाव सेवा सोसायटी चेअरमनपदी सुदाम पाटील यांची बिनविरोध निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : फळेगाव सेवा सोसायटिच्या चेअरमन पदि शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सुदाम पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

फळेगाव सेवा सोसायटीच्या चेअरमन पदा साठी सोसायटी कायौलयात सभा घेण्यात आली, यावेळी सदस्य भुषण जाधव, जगदीश पिताबरे, चंद्रकांत भोईर, भास्कर देसले,सुदाम पाटील, रविकांत पाटील, राजाराम चौधरी, भास्कर जाधव, दिनेश जाधव, सुनंदा देसेकर,सपना जाधव , कुसुम जाधव,उपस्थित होते,

सुदाम पाटील यांनी चेअरमन पदा साठी उमेदवारी अर्ज दाखल केला त्याचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक अधिकारी शांताराम चव्हाण सुदाम पाटील यांची चेअरमन पदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले, सचिव भानुदास कोंडे यांनी सहकार्य केले.

नवनिर्वाचित चेअरमन सुदाम पाटील यांना शुभेच्छा देण्यासाठी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अरुण पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ चौधरी,शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे,उबाठा गटाचे विश्वनाथ जाधव, रमेश बांगर, आदेश जाधव, अश्विन वाघेरे, भगवान जाधव, सुनील देसले, रघुनाथ लोणे, सुनील डवले यांच्या सह आदि उपस्थित होते.

# ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नका,
## शरद पवारांसमोर आव्हाडांचं स्पष्ट वक्तव्य

ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षण मिळावे, ही आमच्या नेत्यांची भूमिका आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये , ही भूमिका आम्ही व्यासपीठावरून जाहीर करतो, असे म्हणत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केलाय. नाशिक येथे आयोजित राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या शिबिरातून ते बोलत होते.



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नाशिक:** "ओबीसी विरुद्ध मराठा ही लढाई हुशारीने लावली गेली आहे. आज कोणाच्या हाती काय आहे हे समजत नाही. छगन भुजबळ यांच्या पेकाटात लाथ मारून मंत्रिमंडळातून बाहेर काढा या वक्तव्याचा मी जाहीर निषेध करतो. एका ज्येष्ठ नेत्याबद्दल असं बोलणं हे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला शोभत नाही. ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये ही भूमिका आम्ही या व्यासपीठावरून जाहीर करतो," असं वक्तव्य राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नाशिक येथील पक्षाच्या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केलं आहे. "ओबीसी इथला क्षुद्र आहे. त्याला व्यवस्थेने कधी विचारातच घेतले नव्हते. ही खंत आंबेडकर यांच्या मनात होती. म्हणून हे आरक्षण दिले गेले. भाजपला ओबीसीबद्दल प्रेम होते, तर मग मंडल आयोगाचा खुल्या मनाने स्वीकार का नाही केला?" असा सवाल आव्हाड यांनी भाजपला विचारला आहे.

भाजपवर हल्लाबोल करताना जितेंद्र आव्हाड पुढे म्हणाले की, "देशात लोकशाहीचा पराभव होतो आहे. राज्यघटना विसर्जित होते आहे. मूठभर लोकांच्या हाती सत्ता ठेवणे हा या सरकारचा उद्देश. जे घर घर तिरंगा म्हणतात त्यांच्या मनात एकेकाळी तिरंग्याबाबत घरघर होती. 1942 च्या आंदोलनात इंग्रजांचे खबरे कोण होते हे इतिहासाच्या पाना पानावर आहे. आज गुगलवर सर्वात जास्त शोध नेहरूंचा घेतला जातो आहे. महाराष्ट्रात जातीय, धार्मिक द्वेष पसरवला जातो आहे. जामनेरला आई वडिलांसमोर मुलाला मारले हा आपला महाराष्ट्र आहे का," असा सवाल राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी नाशिक मध्ये उपस्थित केला.

"शेठजी आणि भटजी यांनीच आयुष्यभर ज्यांचा पक्ष चालवला त्यांच्या मनात ओबीसीबद्दल काय असणार? तुमचा डीएनए ओबीसीचा नाही. आरएसएस यूपी, गुजरात मध्ये नाही तर महाराष्ट्रात जन्माला आली. गांधी हत्या करणारा महाराष्ट्रात जन्माला आला. व्हीजेएनटीला एसटीचे अधिकार द्या, असे हैद्राबाद गेझेटियमध्ये म्हटलं आहे. ओबीसी समाजाला अस्वस्थ करण्याचे कामं सरकारने हुशारीने केले आहे. ओबीसींनी डोळे उघडावेत. भुजबळ यांचा अपमान होतोय, पण मंत्रिमंडळातले कुणीही त्यावर चकर शब्द बोलत नाही हे विशेष. मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे याबाबत आमचं दुमत नाही. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता हे आरक्षण मिळायला हवे. लोकसभेत तुमचे बहुमत. मग वाढवा ना 15 - 20 टक्के आरक्षण. मराठा आरक्षणाचा कायदा आणून दाखवा कास्तकार ताकदीने उभे राहतील. हिम्मत असेल तर आरक्षण देऊन दाखवा," असं आव्हानही जितेंद्र आव्हाड यांनी सत्ताधारी भाजपला दिलं आहे.

### 'पुढचा मोर्चा तरुणांसाठी'

"भाजपला पुन्हा एकदा जात व्यवस्था बदलायची आहे पण हे आम्ही होऊ देणार नाही. बिहारला जनगणना झाली. 63 टक्के ओबीसी आहेत. मी निधर्मी आहे. मला जात नाही. महाराष्ट्र हा फुले शाहू आंबेडकर यांचा आहे. महाराष्ट्र पेटवण्याचं कामं केलं जात आहे. महागाई, भ्रष्टाचारात बरबटलेला महाराष्ट्र हातातून जातोय, हे लक्षात येत असल्याने डिव्हाइड अँड रुल हे धोरण राबवलं जात आहे. ही व्यवस्था बरबाद करायला निघालेली टोळी आहे.

मुंबईत एका रस्त्याच्या उभारणीत तीन हजार कोटींचा घोटाळा झाला असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. ते टेंडर रद्द करावे लागले पण ॲडव्हान्स कोणाच्या खिशात गेला? शक्तीपीठ म्हणजे निव्वळ लक्ष्मीदर्शन आहे. भ्रष्टाचार फक्त आर्थिक नाही तर नैतिक देखील आहे. या देशाचे वाटोळं मनुवादने केले. आजही दिल्लीत बसले आहेत. तेच ओबीसी मराठा यांच्यात भांडण लावत आहेत. इतिहास जड जाणार आहे. आम्ही महाराष्ट्राचं वाटोळं होऊ देणार नाही. पुढचा मोर्चा तरुणांसाठी असेल," अशी घोषणा यावेळी आव्हाड यांनी केली.



# ठाकूर श्यामनारायण पदवी महाविद्यालयाच्या वतीने स्वच्छता मोहिम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कांदिवली** : ठाकूर श्यामनारायण पदवी महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग (DLLE) युनिटने 13 सप्टेंबर 2025 रोजी दादर चौपाटीवर सकाळी 7:00 ते 9:00 या वेळेत, खुशीयान फाउंडेशनच्या सहकार्याने समुद्रकिनारा स्वच्छता मोहिमेचे यशस्वी आयोजन केले. पर्यावरणीय जबाबदारीबद्दल जागरूकता पसरवणे आणि समुदायाच्या कल्याणास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला. नैसर्गिक संसाधने जतन करण्यासाठी आणि सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवण्यासाठी सामूहिक कृती करण्याची गरज यावर जोर देण्यात आला. आम्हाला सांगताना अभिमान वाटतो की TSDC मधील सुमारे 80 विद्यार्थी स्वयंसेवकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. त्यांची बांधिलकी आणि टीमवर्कमुळे समुद्रकिनाऱ्यावर दृश्यमान सकारात्मक बदल तर झालाच पण सहभागींमध्ये सामाजिक जबाबदारीची तीव्र भावनाही निर्माण झाली.

एकत्रितपणे, त्यांनी कचरा, प्लॅस्टिक आणि इतर हानिकारक साहित्य गोळा केले आणि साफ केले. ज्यामुळे स्वच्छ आणि सुरक्षित पर्यावरणासाठी योगदान दिले. टिकाऊपणा, सामाजिक जागरूकता आणि नागरी जबाबदारी या मूल्यांशी सुसंगत अशा प्रभावी उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी DLLE समिती वचनबद्ध आहे.

# भिवंडीतील गोदाम प्रकल्पांना रेरा नोंदणी व परवान्यांची सक्ती करा
## – आ. रईस शेख यांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शरद भसाळे

**भिवंडी** : आशियातील सर्वात मोठ्या लॉजिस्टिक्स हबपैकी एक असलेल्या भिवंडी येथील औद्योगिक गोदाम प्रकल्पांना मंजुरी आणि रेरा नोंदणीची सक्ती करण्यात यावी अशी मागणी 'भिवंडी पूर्व'विधानसभा क्षेत्राचे आमदार रईस शेख यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

विकासाचे सुलभीकरण आणि लघु व मध्यम गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी गोदाम प्रकल्पांना नियम अत्यावश्यक असल्याचा दावा आ. शेख यांनी केला आहे.

**भिवंडीत बेकायदा गोदामांच्या संख्येत वाढ – आ. रईस शेख**



मुख्यमंत्री फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात आमदारांनी नमूद केले आहे की, भिवंडीमध्ये अलिकडच्या काळात गोदाम बांधकामांमध्ये भरमसाठ वाढ झाली आहे.

विकासकांच्या सहकार्याने लहान आणि मध्यम गुंतवणूकदारांकडून येथे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात येत आहे. अनेक गोदामे एमएमआरडीए, एमआयडीसी किंवा स्थानिक महानगर पालिका यासारख्या सक्षम नियोजन किंवा विकास प्राधिकरणाच्या मंजुरीशिवाय बांधली जात आहेत.

हे प्रकल्प रिअल इस्टेट (नियमन आणि विकास) कायद्यांतर्गत (रेरा) मान्यताप्राप्त नसल्यामुळे, गुंतवणूकदार कायदेशीर सुरक्षा आणि जबाबदारी यंत्रणा पासून वंचित राहत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये, गुंतवणूकदार विकासकांशी करार करतात, परंतु प्रकल्प सुरू होण्यास अपयशी ठरतात किंवा अपूर्ण राहतात.

परिणामी, लहान आणि मध्यम गुंतवणूकदारांना न्याय किंवा परतफेडीचा कोणताही आधार न घेता गंभीर आर्थिक नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे भिवंडी आणि संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व औद्योगिक गोदाम प्रकल्पांना अनिवार्य मान्यता आणि रेरा नोंदणी मिळावी, असे आ. शेख यांनी पत्रामध्ये म्हटले आहे.

गोदाम प्रकल्पांना एमएमआरडीए, एमआयडीसी किंवा महानगरपालिका सारख्या अधिकाऱ्यांकडून इमारत आणि लेआउट प्लॅन मंजुरी घेणे आणि रेरा अंतर्गत नोंदणी करणे अनिवार्य करण्याची वेळ आली आहे.

हे उपाय केवळ गुंतवणूकदारांचे संरक्षण करणार नाहीत तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय भागधारकांच्या दृष्टीने नियोजित वाढ, अनुपालन आणि विश्वासार्हतेसह एक अग्रगण्य गोदाम केंद्र म्हणून भिवंडीचे स्थान मजबूत करतील," असा दावा आ. रईस यांनी आपल्या पत्रामध्ये केला आहे.



# श्री संत राममारुती महाराज पुण्यतिथी उत्सवानिमित्त १५०० पुरणपोळ्यांचा पार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याणमधील श्री संत राममारुती महाराज यांचा १०७ वा पुण्यतिथी उत्सव सोमवार दि. ८ सप्टेंबर ते सोमवार दि. १५ सप्टेंबरपर्यंत श्री राममारुती मंदिरात होत आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज अष्टमीच्या निमित्ताने श्री राम मारुती महाराजांना प्रिय असलेले नैवेद्य म्हणुन 1500 पुरणपोळया अणि वालाचे बीरडे यांचा पार रचण्यात आला. तसेच `श्रीं 'पादुकांची पालखीतुन सायंकाळी भव्य मिरवणुक व आरती, महाप्रसादाचे आयोजन सोमवारी (ता. 15) रोजी करण्यात आले आहे.

# लोक अदालतमध्ये पुन्हा जुळल्या सात जोडप्यांच्या रेशीमगाठी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
पेण (प्रतिनिधी)

बेलापूर विभक्त होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या ०७ जोडप्यांनी शनिवार १३.०९.२०२५ रोजी कौटुंबिक न्यायालय, बेलापूर नवी मुंबई येथे पार पडलेल्या लोकअदालतीत पुन्हा सुखाने नांदण्याचा निर्णय घेतला. सदर लोकअदालतीत कौटुंबिक न्यायालयात एकुण ९८ दावे ठेवण्यात आले होते. या दाव्यांमधील ०७ जोडप्यांनी घटस्फोटाचा मार्ग सोडून पुन्हा संसार सुरू करण्याचा निर्णय घेतला, त्यांच्या रेशीमगाठी पुन्हा जुळल्याने त्यांचे परिवार व मुले आनंदी झाली आहेत. यावेळी न्यायाधीशांच्या हस्ते सोबत नांदायला गेलेल्या जोडप्यांना नवी मुंबई कोर्ट वकिल संघटना यांच्यातर्फे "नांदा सौख्यभरे"




चे प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस.बी. अग्रवाल, बेलापूर तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश-१ सी.व्ही. मराठे, कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश सुभाष रं. काफरे व प्राधिकरणाचे सचिव रविंद्र पाजणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही लोकअदालत पार पडली. सध्या न्यायालयात वैवाहीक वादाचे व पोटगीसाठीचे १७७२ दावे प्रलंबित आहेत. यापैकी ९८ दावे लोक अदालतीसमोर निकाली काढण्यासाठी ठेवले होते.

पी. ए. साने, जिल्हा न्यायाधीश-३ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बेलापूर, नवी मुंबई आणि डिंपल चांद्रा, विधीज्ञ वकिल संघटना नवी मुंबई यांनी पॅनल सदस्य म्हणून काम पाहिले.

सदर लोकन्यायालयाच्या यशस्वीतेसाठी नवी मुंबई कोर्ट वकील संघाचे अध्यक्ष सुनिल मोकल, उपाध्यक्ष संदिप रामकर, सचिव विकास म्हात्रे, खजिनदार तुषार राऊत, सहसचिव संजय म्हात्रे व हेमांगी पाटील आणि कार्यकारिणी सदस्य समीत राऊत, दत्तात्रय जगताप, अजिंक्य गव्हाणे, निलेश पाटील आणि डिंपल चांद्रा यांनी सहकार्य केले.

तसेच कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक गणेश हिरवे, विवाह समुपदेशक भारत काळे, लघुलेखक विजय पोटे, सहा अधिक्षक राजेश म्हात्रे, वरिष्ठ लिपीक कांचन किर्वे, कनिष्ठ लिपीक श्रेया म्हात्रे, अक्षता कोळसुंदकर आणि सहाय्यक प्रिती नन्नावरे व राज निकम यांनी यशस्विरित्या सहकार्य केले.

# सकारात्मक समाज प्रेरणा जागृतीत जे.एस.एस रायगडचे भरीव योगदान – डॉ मेधा सोमैया

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून व पत्रकार मिलिंद खारपाटील यांच्या विशेष पुढाकारातून दोन दिवसीय पत्रकारिता प्रमाणपत्र कार्यशाळेचे आयोजन "जे. एस. एस. रायगड" पर्यावरण पूरक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सहाण-अलिबाग या ठिकाणी दिनांक 13 व 14 सप्टेंबर 2025 रोजी करण्यात आले

ह्या दोन दिवशीय कार्यशाळेचे उद्घाटन 13 सप्टेंबर 2025 रोजी संपन्न झाले. उद्घाटन समारंभ प्रसंगी शहरी व ग्रामीण भागातील गरजू व दिव्यांग लाभार्थ्यांनी मध्ये जन शिक्षण संस्थान रायगड च्या माध्यमातून सकारात्मक प्रेरणा जागृतीत भरीव योगदान दिले असल्याचे मत मुलाखती प्रसंगी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ मेधा सोमैया यांनी व्यक्त केले तर समाजाचा सकारात्मक आरसा म्हणून पत्रकारिता हे कौशल्य अतिशय प्रभावी असल्याचे मत विद्यमान अध्यक्ष डॉ नितीन गांधी यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले. पत्रकारिता कार्यशाळेच्या माध्यमातून एक सक्षम पत्रकार व दर्जेदार पत्रकारिता निर्मिती हेच कार्यशाळेचे मुख्य ध्येय असल्याचे मत संचालक डॉ विजय कोकणे यांनी व्यक्त केले.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा सौ. रत्नप्रभा बेल्हेकर, नरेनभाई जाधव संचालक डॉ. विजय कोकणे व व्यवस्थापन मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली व "कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार" यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील 20 वर्ष पासून सक्रिय पणे सुरु आहे व संस्थेने आजपर्यंत 70 हजाराहून अधिक प्रशिक्षणार्थी यशस्वीरित्या प्रशिक्षित केलेले आहेत व अशा अनेक वेळा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त संस्थेच्या माध्यमातून भारत सरकार पुरस्कृत कार्यशाळेचे प्रमाणपत्र हे निश्चितच पत्रकारांना पाठबळ देईल व म्हणूनच आम्ही कार्यशाळेच्या आयोजन नियोजनाकरिता पुढाकार घेतला असल्याचे मत पत्रकार मिलिंद खारपाटील यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले तसेच भविष्यात अनेक पत्रकार समूहाने अशा कार्यशाळेचे आयोजन निश्चितच जन शिक्षण संस्थांच्या सहकार्यातून करतील असा विश्वास देखील त्यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केला.

सदर संपूर्ण कार्यशाळेच्या कार्यक्रमा प्रसंगी संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा सौ. रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे, धर्मराज सामाजिक प्रतिष्ठान रायगडचे संचालक सचिन चव्हाण, अकाउंट मॅनेजर सौ. प्रतिक्षा चव्हाण, वेदांत बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सौ. आशा कोकणे,सोहम वारंगुसे, सौ.पूजा वारंगुसे, पत्रकार मिलिंद खारपाटील, यांच्या समवेत महाराष्ट्रातील विविध विभागातून आलेले पत्रकार सौ तृप्ती भोईर, सौ सुजाता होळकर, चांगदेव शिवकर, राजेश सोंडकर, सचिन घबाडी, विनायक पाटील, संदेश पाटील, धनाजी घरत, श्रीमती रणिता ठाकूर, सौ दर्शना माळी, अनिल भोईर यांच्या मुख्य उपस्थितीत सर्वांनी कार्यशाळेत हिरीरीने सहभाग नोंदवला

कार्यक्रमाचा समारोप सदर संस्था प्रतिनिधींच्या हस्ते 14 सप्टेंबर 2025 रोजी सहभागी पत्रकार बंधू भगिनींना प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.

# भविष्यवेध



सोमवार
१५ सप्टेंबर २०२५

**मेष**
आजचा दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे. तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते.

**वृषभ**
दिवस तुमच्यासाठी अनुकूल असणार आहे. आज तुम्हाला ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्या पूर्ण करण्यासाठी तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मिथुन**
आज तुम्ही तुमचे व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल आणि एखाद्या महत्त्वाच्या राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल.

**कर्क**
आजचा दिवस तुमच्यासाठी नवीन उत्साहाने भरलेला असणार आहे. आज व्यवसायात नफा मिळविण्यासाठी तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल.

**सिंह**
आजचा दिवस तुमच्यासाठी सुवर्ण दिवस असणार आहे. तुमची वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**कन्या**
कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होई ल. तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल. महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील.

**तूळ**
व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील. विरोधक नुकसान करण्याचा प्रयत्न करतील.

**वृश्चिक**
या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते. आज तुमचे कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल. दिवस चांगला जाणार आहे.

**धनू**
आज तुम्ही काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर पूर्ण होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे.

**मकर**
दिवस तुमच्यासाठी अनुकूल असणार आहे. तुमच्या कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**कुंभ**
आजचा दिवस तुमच्यासाठी उत्तम राहील. यावेळी लोक सर्वोत्तम कल्पना ऐकण्यासाठी आणि जाणून घेण्यासाठी खूप उत्सुक असतील.

**मिन**
आज, तुम्हाला जे काही लोकांना पटवून द्यायचे आहे, ते तुम्ही सहजतेने मान्य करू शकता. तुमचा अधिकार गाजवण्याच्या तुमच्या प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवा.




# मेट्रोचा पुन्हा एकदा निष्काळजीपणा

## घोडबंदर मार्गावर लोखंडी रॉड वाहनावर पडला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** भिवंडी येथे मेट्रो कामासाठी लागणारी लोखंडी सळई प्रवाशाच्या डोक्यात घसलयाचे प्रकरण ताजे असताना आता घोडबंदर मार्गावरील कापरबावडी भागात दोन डोक्यात घुसल्याचे प्रकरण ताजे असताना, आता घोडबंदर मार्गावरील कापुरबावडी भागात दोन लोखंडी रॉड कारवर पडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) सुरु असलेल्या कामांविषयी पश्नचिन्ह निर्माण होत आहे. कापूरबावडी भागात आता पर्यंत तीन वाहनांसोबत अशा घटना पडल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या आणि वाहन चालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

ठाणे शहरात मेट्रो चार (ठाणे-घाटकोपर-वडाळा) आणि मेट्रो पाच (ठाणे-भिवंडी-कल्याण) या नार्गिकेच्या निर्माणाची कामे सुरू आहेत. या कामांमुळे नागरिकांना वाहतुक कोंडीचा मनःस्ताप सहन करावा लागतो. त्यासोबत आता त्यांची सुरक्षितता देखील धोक्यात आली आहे. मेट्रो चार आणि पाच या दोन्ही मार्गिकांना जोडणाऱ्या महत्वाच्या टप्प्याची कामे कापूरबावडी येथे सुरू

असतानाही येथे कामामध्ये देखील निष्काळजीपणा दिसून येत आहे.

भिवंडी येथील काल्हेर भागात राहणारे ४७ वर्षीय अमोल लाठे हे त्यांच्या ८३ वर्षीय वडिलांना कारमधून घोडबंदर येथील एका खासगी रुग्णालयात गेले होते. परंतु रुग्णालय बंद असल्याने ते घोडबंदर येथून कापूरबावडी मार्गे काल्हेर येथे परतत असताना कापूरबावडी भागात अचानक मेट्रोच्या कामासाठी उन्नत मार्गावर ठेवलेले दोन रॉड त्यांच्या वाहनावर पडले. हे रॉड कारच्या आरशावर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेनंतर संतापलेल्या अमोल लाठे यांनी तेथील कंत्राटदार कर्मचाऱ्यांना जाब विचारला. तसेच पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले.

कापूरबावडी भागात यापूर्वी अशा दोन घटना उघडकीस आल्या होत्या. ३० जुलैला तत्वज्ञान विद्यापीठ भागातून प्रवास करणाऱ्या वाहन चालकाच्या कारवर रॉड पडला. या घटनेत चालक थोडक्यात बचावला होता. २ मे या दिवशी एका कारवर मेट्रो कामासाठी बसविण्यात आलेल्या क्रेनचा भाग कोसळला. या घटनेतही चालक आणि त्याचे कुटुंबिय बचावले होते. आता अमोल यांच्यासोबत ही घटना घडल्याने कंत्राटदारांच्या कामाविषयी प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.



# उरण नगर परिषद प्रभाग रचनेवर शून्य हरकती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण** : नगर परिषदेच्या नवीन प्रारूप प्रभाग रचनेनंतर शहरातील प्रभागाची संख्या नऊ ऐवजी दहा झाली आहे. शासनाच्या नियमानुसार १७ सदस्य संख्या वाढून नगराध्यक्ष वगळून तीनने वाढली असून २१ पर्यंत पोहचली आहे.

९ प्रभागातून प्रत्येकी दोन तर एका प्रभागातून तीन सदस्य अशी २१ सदस्य संख्या झाली आहे. या नव्या प्रभाग रचनेला एकही हरकत दाखल झालेली नाही. त्यामुळे हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे सादर करण्यात आला आहे. प्रभाग रचनेवर तक्रारी नसलेली उरण ही रायगड जिल्ह्यातील एकमेव नगरपरिषद ठरण्याची शक्यता आहे. मागील तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे.

उरण नगरपरिषदेचा कारभार मागील तीन वर्षांपासून प्रशासनाकडे सोपविण्यात आला आहे. नवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर उनपची अंतिम प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे नेर्देश देण्यात आले आहेत. याआधी १७ हजारांहून अधिक मतदारांची संख्या असलेल्या

उनपमध्ये ९ प्रभागातुन १८ सदस्य व नगराध्यक्ष पदासाठी निवड केली जात होती. आता नवीन प्रभाग रचने नंतर प्रभागाची संख्या नऊवरुन दहा झाली आहे. तर सदस्य संख्या नगराध्यक्ष वगळून तीनने वाढली असून २१ पर्यंत पोहचली आहे. ९ प्रभागातून प्रत्येकी दोन तर एका प्रभागातून एकूण तीन सदस्य अशी २१ सदस्य संख्या आहे

या निवडणुकीतून नगर परिषदेमध्ये २१ नगरसेवक निवडून जाणार आहेत. पूर्वी नगरसेवकांची संख्या १८ होती. आता ती लोकसंख्येच्या तुलनेत तीनने वाढवण्यात आली आहे. उरण नगर परिषदेचा कारभार मागील तीन वर्षांपासून प्रशासनाकडे सोपविण्यात आला आहे. निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर अंतिम प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याआधी १७हजारांहून अधिक मतदारांची संख्या असलेल्या उरणमध्ये नऊ प्रभागातून १८ सदस्य व नगराध्यक्षपदासाठी निवडणूक घेतली जात होती. आता नवीन प्रभाग रचनेनंतर प्रभागाची संख्या नऊवरून दहा झाली आहे, तर सदस्य संख्या नगराध्यक्ष वगळून तीनने वाढली असून २१ पर्यंत पोहोचली आहे. दरम्यान उरण नगर परिषदेच्या अंतिम प्रभाग रचनेचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी समीर जाधव यांनी दिली.

# कचरामुक्तीसाठी मीरा भाईंदर मनपाचा उत्तन येथे नवा प्रकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भाईंदर : मिरा भाईंदरमधून निघणाऱ्या घातक कचऱ्यावर शास्त्रशुद्ध आणि वैज्ञानिक प्रक्रिया करून पर्यावरण संतुलन राखणारा नवा घनकचरा प्रकल्प उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यासाठी केंद्र शासनाच्या अर्थ व्यवहार विभागाने (डीईए) मान्यता दिलेल्या सल्लागाराची नियुक्ती केली जाणार आहे. मिरा भाईंदर शहरातून दररोज सुमारे ४५० टन कचरा निघतो. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी उत्तन येथे घनकचरा प्रकल्प उभारण्यात आला आहे. सध्या या प्रकल्पाचे संचालन मे. सौराष्ट्र एन्व्हायरो प्रोजेक्ट या संस्थेकडे असून, संस्थेची मुदत २०२६ मध्ये पूर्ण होणार आहे. प्रामुख्याने या



प्रकल्पात कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते, मात्र घातक कचऱ्यावर शास्त्रशुद्ध आणि पुरेशी वैज्ञानिक प्रक्रिया होत नसल्याने जल, वायू आणि भूप्रदूषण वाढत आहे.

भविष्यात शहरातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा विचार करता महापालिकेला आधुनिक तंत्रज्ञानयुक्त घनकचरा प्रकल्प उभारावा लागणार आहे. त्या दृष्टीने उत्तन येथील ३१ हेक्टर जागेवरच नवा प्रकल्प उभारण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यासाठी सल्लागार नियुक्त करण्याचा प्रशासकीय ठराव नुकताच मंजूर करण्यात आला आहे.

महापालिकेमार्फत उभारण्यात येणाऱ्या नव्या घनकचरा प्रकल्पात स्वच्छ भारत अभियान तसेच घनकचरा नियम २०१६ आणि २०२४ नुसार मटेरियल रिकव्हरी सुविधा, वेस्ट टू एनर्जी, बायोप्लांट, ऑर्गेनिक वेस्ट एनर्जी अशा एकात्मिक व वैज्ञानिक दृष्ट्या सक्षम घनकचरा व्यवस्थापनाची सोय असणार आहे. महापालिकेकडून नियुक्त केल्या जाणाऱ्या सल्लागार संस्थेला ३० कोटी इतकी रक्कम अदा केली जाणार आहे. सदर संस्थेला घनकचरा प्रकल्प उभारण्यापूर्वी संकल्पनात्मक अहवाल तयार करण्यासाठी सेवा देणे, प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, पीपीपी प्रकल्पासह पायाभूत सुविधा प्रकल्प तयार करणे, प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक असलेला केंद्र, राज्य निधी गोळा करण्यासाठी पत्रव्यवहार करणे, आणि प्रकल्प उभारत असताना देखभाल करण्यासाठी जबाबदारी सोपवण्याचे प्रशासनाने मंजूर केलेल्या प्रशासकीय ठरवत नमूद करण्यात आले आहे.

# पाण्यासाठी जलकुंभाचे श्राद्ध

## दिव्यातील पाणीटंचाई विरोधात ठाकरे गटाचे आंदोलन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दिवा** : दिवा शहरातील पाणीटंचाईच्या समस्येविरोधात शिवसेना (ठाकरे गट) पक्षाने अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. गेल्या १२ वर्षांपासून बंद असलेल्या दोन जलकुंभांचे श्राद्ध घालून शिवसेनेच्या महिला आघाडी आणि शिवसैनिकांनी दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाचा निषेध केला आणि पाणी समस्येकडे लक्ष वेधले. लवकरात लवकर पाणी प्रश्न सुटला नाही तर, शोले स्टाईल आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला.

दिव्या शहरात पाणी टंचाईची समस्या मोठ्याप्रमाणात आहे. यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे. पाण्यासाठी अनेकांना पायपीट करावी लागते. या शहरातील पाणी टंचाईची समस्या दूर व्हावी यासाठी या शहरातील बेतवडे येथे १२ वर्षांपूर्वी दोन जलकुंभ बांधले होते. परंतू, हे दोन्ही जलकुंभआजतागायत बंद असल्याची माहिती समोर आली आहे.

यामुळे शहरातील अनेक भागांत असमान पाणी वितरण होत आहे. तर, काही ठिकाणी पाणीटंचाईची समस्या भेडसावत आहे. पाणी टंचाईची समस्या असतानाही अद्याप हे जलकुंभ सुरु करण्यात आलेले नसल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिक विविध टीका करु लागले आहेत. आता, यामध्ये विरोधी पक्षाने देखील उडी घेतली आहे.

नागरिकांसाठी बांधण्यात आलेले जलकुंभ अद्याप बंद का असा सवाल शिवसेना (ठाकरे गट) पक्षाकडून विचारला जाऊ लागला आहे. शिवसेना (ठाकरे गट) पक्षाच्या वतीने रविवारी अनोखे आंदोलन करण्यात आले. महिला पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेत जलकुंभाचे 'श्राद्ध' घालत आंदोलन केले. या अनोख्या आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. यावेळी काही कार्यकर्त्यांनी मुंडन करून आणि 'अंतिम संस्कार करत प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचा निषेध केला. यावेळी ज्योती पाटील यांनी प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती केली. "जर या जलकुंभातून पाणीपुरवठा करायचाच नव्हता, तर ते कशाला बांधले? आणि त्यावर झालेला लाखो रुपयांचा खर्च कोणाकडून वसूल करणार?" असे सवाल त्यांनी केले.

हे आंदोलन शिवसेना (ठाकरे) नेते राजन विचारे, जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे, जिल्हाप्रमुख केदार दिघे, सुभाष भोईर आणि जिल्हा संघटक तात्या माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. महिला जिल्हा संपर्कप्रमुख मृणाल यज्ञेश्वरी आणि महिला जिल्हा संघटिका वैशाली दरेकर-राणे यांच्या सूचनेनुसार या आंदोलनाची योजना आखण्यात आली. या आंदोलनात दिवा शहरातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# बदलापुरात एटीएम ऑपरेटरकडून दोन लाखांचा अपहार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : बदलापुर शहरात एटीएम मशीनमध्ये कमी रक्कम जमा करून उर्वरित पैसे स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. तब्बल दोन लाख चार हजार पाचशे रुपये इतक्या रकमेत अपहार झाल्याचे स्पष्ट झाले असून, या प्रकारामुळे एटीएम सेंटरच्या पैशांच्या सुरक्षेवर आणि विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एटीएम परिसरात एटीएमची अदराबदल करून, तिथे एटीएमधारकाला गोंधळात टाकून पैसे काढून लंपास करण्याचे प्रकार गेल्या काही वर्षात समोर आले आहेत. मात्र एटीएममध्ये पैसे भरणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून एटीएममध्ये भरणा करण्यासाठी असलेली रोकड मीशनमध्ये न भरता तीचा वापर खासगीत करण्याचा धक्कादायक प्रकार बदलापुरात समोर आला आहे. याप्रकरणी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर ही बाब समोर आली आहे.

ही फसवणूक ५ एप्रिल २०२५ ते १२ मे २०२५ या कालावधीत घडली. हिताची कॅश मॅनेजमेंट सर्विस कंपनीकडून नेमण्यात आलेले दोन एटीएम ऑपरेटर अर्थात कस्टडीयन जय पाटील आणि भुषण कडू यांच्यावर याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंपनीकडून त्यांना नियमितपणे बदलापूर पूर्व रेल्वे स्टेशन परिसरातील एटीएम सेंटरमध्ये रक्कम भरण्याचे काम सोपवले गेले होते. मात्र, दोघांनी मिळून एटीएम आयडी एमपीबी ०२५६७ व एटीएम आयडी एसपीबी०३१५१ या दोन मशीनमध्ये ठरल्यापेक्षा कमी पैसे भरले. उर्वरित रक्कम त्यांनी स्वतःजवळ ठेवत स्वतःच्या फायद्यासाठी वापरली. अशा प्रकारे एकूण २ लाख ०४ हजार ५०० रुपये कंपनीकडून लंपास केले गेले.

घटनेचा तपास सुरू असताना कंपनीच्या अंतर्गत हिशोब तपासणी दरम्यान हा आर्थिक गैरप्रकार समोर आला. त्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तातडीने बदलापुर पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या गंभीर प्रकरणी दोन्ही आरोपींवर फसवणूक आणि अपहार यांसंबंधीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिस अधिक तपास करून अचूक रक्कम, आरोपींनी पैसे कुठे खर्च केले याचा शोध घेत आहेत. एटीएमसारख्या सुरक्षित व विश्वासार्ह मानल्या जाणाऱ्या यंत्रणेतच अशी फसवणूक झाल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. कंपनीकडून भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर नियम व नियंत्रण यंत्रणा उभारण्याचे संकेत दिले आहेत. नागरिकांच्या नजरेत एटीएम ऑपरेटर व कॅश मॅनेजमेंट कंपन्यांची विश्वासार्हता टिकवून ठेवणे आता मोठे आव्हान ठरणार आहे. या घटनेमुळे अशा प्रकारच्या रोख व्यवहारांवर अधिक काटेकोर देखरेखीची गरज अधोरेखित झाली आहे.

# पालघर जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची १८ टक्के पदे रिक्त

**मुंबई उच्च न्यायालयाने मानवी मूल्यांचा आधार घेऊन शिक्षकांना सोडावे, असे आदेश दिले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेने शिक्षकांना सोडले असून त्यांना पालघर जिल्हा परिषदेतून कार्यमुक्त केले आहे. - सोनाली मातेकर, शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जि.प. पालघर**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** : पालघर जिल्हा परिषदेमध्ये २०१७ पासून मराठी माध्यमाच्या शिक्षकपदांची रिक्त पदे आहेत. त्यामुळे जिल्ह्याबाहेर बदली करून जाणारे शिक्षकांसह विकल्पाने बदली घेणाऱ्या शिक्षकांना सोडू नये, असा ठराव जिल्हा परिषदेने घेतला होता; मात्र जिल्हा परिषदेने ४०४ आंतरजिल्हा तर २२१ शिक्षकांना विकल्पने सोडल्यामुळे अठरा टक्के रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागणार आहे.

पालघर जिल्ह्यामध्ये ४०४ शिक्षक यांनी आंतरजिल्हा बदलीचे प्रस्ताव दिले होते. तर ठाणे पालघर जिल्हा विभाजनानंतर ठाणे जिल्ह्यात जाणाऱ्या विकल्प बदलीच्या २२१ शिक्षकांनी बदलीसाठी प्रस्ताव दिले होते; पण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी नवीन भरतीपर्यंत कोणताही शिक्षक सोडू नये, असा ठराव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत करण्यात आला होता. या बदली प्रक्रिया थांबल्याने शिक्षकांनी निवेदने, आंदोलने केली. यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर बदली प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली. त्यानंतर ६२५ शिक्षकांनी दोन वेगवेगळ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केल्या. या वेळी न्यायालयाने मानवी हक्क, मूल्यांचा विचार करून शिक्षकांना सोडावे, असे आदेश दिले. या आदेशाचे आधार धरून आंतरजिल्हा बदल्यातील ४०४ शिक्षकांनाही सोडले गेले. तर आंतरजिल्हा बदलीचा मार्ग मोकळा झाल्याचे सांगण्यात येते.

### साडेसात लाख विद्यार्थ्यांना फटका

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात मराठी माध्यमातील शिक्षकांची ६,३४२ पदे मंजूर असताना सर्वाधिक १,१५५ पदे रिक्त आहेत. २०२४-२०२५च्या संच मान्यतेनुसार गृहित धरलेली आहेत. पालघर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सहावी ते आठवी इयत्तासाठी लागणारे विज्ञान गणिताचे पदवीधर विषय शिक्षकांची रिक्त पदांची संख्या मोठी आहे.

# रेतीमुळे सहजानंद चौकात वाहतूक कोंडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. १४** : पश्चिमेतील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या सहजानंद चौकात रविवारी (ता. १४) मध्यरात्रीच्या सुमारास वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. रस्त्याच्या मधोमध रेतीचा ढिगारा पडल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे वाट काढून वाहने मार्गस्थ होत असताना मागे रांगा लागल्याने इतर लेनवरीलही वाहतूक प्रभावित झाली होती. वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी पोहोचत हा रेतीचा ढिगारा हटवून वाहतूक पूर्वपदावर आणली असल्याची माहिती प्रवाशांकडून देण्यात आली.

सहजानंद चौकातून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. या चौकात तब्बल सहा रस्ते एकत्र येत असल्याने मार्गिका बदलताना कोणते वाहन कुठे वळण घेत आहे, हे समजण्यातच दुसऱ्या वाहनचालकांचा गोंधळ उडतो. छत्रपती शिवाजी महाराज चौक, रामबाग, काळा तलाव, लाला चौकी आदी भागांतून येणारी वाहने या चौकातून मार्गस्थ होत असल्याने वाहतूक कोंडी अधिक प्रमाणात होत असते. अशातच, रस्त्यांच्या मधमोधच रेतीचा ढिगारा पडल्याने वाहने अडकून पडत होती. अखेर वाहतूक पोलिसांनी मातीचा ढिगारा हटवल्याने वाहतूक पूर्वपदावर आली.

# भारत पाकिस्तान क्रिकेट पार्श्वभूमीवर भिवंडीत शिवसैनिकांचे निषेध आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : पहलगाम हल्ल्यात निष्पाप लोकांचे बळी घेणाऱ्या पाकिस्तान सोबत क्रिकेटचा सामना खेळून भाजप सरकारने देशातील महिला भगिनीच्या सिंदूराचा अपमान केला आहे.भाजप सरकारच्या भूमिकेचा तीव्र निषेध करण्यासाठी आज दुपारी भिवंडी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौका त शिवसेना (ठाकरे) पक्षाच्यावतीने निदर्शने करीत शिवसैनिक व महिला आघाडीच्यावतीने घोषणाबाजी करीत आंदोलन करण्यात आले.

भिवंडी जिल्हाप्रमुख मनोज गगे, लोकसभा महिला संपर्क संघटिका आशाताई



रसाळ,उपनेते विश्वास थळे, महिला आघाडीच्या संघटिका वैशाली मेस्त्री,राजा पुण्यार्थी,माजी शहरप्रमुख मोहन वल्लाल,विजय कुंभार यांच्या सह शेकडो शिवसैनिक व महिला आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी भाजप सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करीत पाकिस्तानाचा निषेध करण्यात आला,सरकारने पाकिस्तान सोबत क्रिकेट सामना खेळून महिला व भारत देशाचा अवमान केला आहे.पहलगाम येथे निष्पाप हिंदु पर्यटकांना पाकिस्तानी दहशतवाद्यांनी गोळ्या घातल्या असे असताना भाजप सरकार हा क्रिकेट सामना खेळवतात याबद्दल निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी महिला पदाधिकाऱ्यांनी आपल्या कंपाळावर लावण्यात येणारे कुंकू डबी (सिंदूर)पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवण्यासाठी एका बॉक्समध्ये जमा करून पाठवणार असल्याचे सांगितले.या आंदोलन मोठ्या संख्येने शिवसैनिक व महिला वर्ग सहभागी झाले होते.

ठाणे ■ सोमवार
१५ सप्टेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# भिवंडी : इमारतीच्या दहाव्या मजल्या वरील फ्लॅटमध्ये भीषण आग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी शहरातील अंजुर फाटा ओसवाल वाडी परिसरात असलेल्या अंतरिक्ष या सोसायटीच्या दहाव्या मजल्यावरील एका फ्लॅट मध्ये आग लागण्याची खळबळजनक घटना घडली आहे.या फ्लॅट मधून मोठ्या प्रमाणावर धुराचे मोठे लोट बाहेर पडत होते.या घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन दोन तासाच्या प्रयत्नाने ही आग आटोक्यात आणून शांत केली आहे.

दरम्यान या आगीची माहिती मिळताच संपूर्ण इमारती मधील घाबरलेल्या सर्व कुटुंबीय फ्लॅट बाहेर पडून इमारतीखाली जमा झाले होते. ही आग कशामुळे लागली याचे कारण अस्पष्ट असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी फ्लॅट मधील किमती साहित्य जाळून खाक झाले आहे. दरम्यान ही आग कोणाच्या फ्लॅट मध्ये लागली याची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला मात्र संपूर्ण माहिती मिळाली नाही.



## ओतूरः राष्ट्रीय लोक न्यायालयात मोटार वाहन कायद्याची प्रकरणे निकाली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ओतूरः** शनिवार दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय लोक न्यायालयात, मा. जिल्हा न्यायाधीश श्रीमती नायर यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्री हुसेन, सह दिवाणी न्यायाधीश अनंत बाजड, श्रीमती स्वप्ना घुले आणि श्रीमती श्रेया जैन यांनी पॅनल जज म्हणून काम पाहिले.

या लोक न्यायालयात अनंत बाजड यांनी एक अभिनव संकल्पना राबवून, मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अंतर्गत शिक्षा पात्र असलेल्या गुन्ह्यांमध्ये प्ली बार्गेनिंग (शिक्षे बाबत सौदा) या प्रक्रियेचा वापर करून अनेक प्रकरणे निकाली काढली. याहूनही विशेष म्हणजे, आरोपींना केवळ आर्थिक दंड न करता पर्यावरण रक्षणासाठी योगदान देण्याचा आदेशही देण्यात आला. वानखात्याच्या परवानगीने आरोपींना जुन्नर वन परीक्षेत्रात वड, पिंपळ, चिंच, कडुलिंब, बेल, उंबर अशा पर्यावरणास पोषक वृक्षांचे प्रत्येकी दोन रोप लावण्याचा आदेश दिला गेला.

या उपक्रमाद्वारे न्यायालयाने न्यायदानासोबत पर्यावरण संरक्षणाची जबाबदारीही स्वीकारली असून, लवकरच अशा प्रकारे एकूण १०० वृक्ष लावण्याचा संकल्प केला आहे. हा उपक्रम न्यायदान आणि पर्यावरण यांचा सुंदर समन्वय साधणारा असून, सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा आहे.

## युवराज्ञी येसूबाईच्या इतिहासावर करूणाताई गगे यांचे व्याख्यान




**मुरबाड ■ प्रतिनिधी**
**(दिलीप पवार)**

अल्पावधीतच संपूर्ण ठाणे,पालघर, रायगड जिल्ह्यात एक उत्कृष्ट निवेदिका, अभ्यासू शिवव्याख्यात्या, प्रवचनकार,भजन गायिका ते टिव्ही मालीका होममिनिस्टर पर्यंत अशा विविध क्षेत्रात प्रसिद्धी मिळवलेल्या, अंगी विविध कला गुणांचा समावेश असलेल्या शहापूर-मुरबाडच्या मातीत जन्मलेल्या शिवकन्या सौ.करूणाताई सचिन गगे यांनी ठाणे जिल्ह्यात आपला एक वेगळा ठसा उमटविला आहे.

दिवसें- दिवस त्यांच्या कार्यक्रमांना वाढती मागणी असून प्रत्येक दिवस त्या कार्यक्रमात अत्यंत व्यस्त आहेत. नुकताच त्यांचा कल्याण येथे कल्याण महिला मंडळाने त्यांच्या मंडळाच्या 81 व्या अभ्यासवर्गा निमित्त करूणा गगे यांचे व्याखान आयोजित केले होते. त्यांचा विषय होता "युवराज्ञी येसुबाई".

आजपर्यंत आपण छत्रपती संभाजी राजांचा इतिहास वाचला, अभ्यासला परंतु येसूबाईंचे चरित्र हवे तेवढे अभ्यासले नाही. कदाचित संभाजी राजांच्या चरित्रापुढे महाराणी येसूबाईचं चरित्र झाकले गेले असावे. परंतु या महान युवराज्ञीच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा देण्याचे महत्वाचे काम करूणाताई गगे यांनी केले असून कल्याण येथे हजारो माता -भगिनींना येसूबाई कोण होत्या ,त्यांचे स्वराज्यासाठीचे योगदान, त्याग,समर्पण,निष्ठा आपल्या पहाडी व ऐतिहासिक शैलीत मांडून संपूर्ण सभागृह दणाणून सोडले.येसूबाई सारखी सुन, येसूबाई सारखी पत्नी, येसूबाई सारखी आई होणे नाही. युवराज्ञी येसूबाई ते महाराणी येसूबाई असा येसूबाईंचा जिवन चरित्राचा एवढा गाढा अभ्यास आम्ही आजपर्यंत कुठेही ऐकला नव्हता तो इतिहास आज आम्हांला तुमच्या रूपाने ऐकाला मिळाला असे गौरोद्गार व्याख्यान संपल्यानंतर उपस्थित महिलांनी व्यक्त करून करूणाताईंचे मनापासून कौतुक केले.

याविषयी करुणाताई गगे यांची प्रतिक्रिया घेतली असता आजपर्यंत हा इतिहास समाजा समोर कोणी मांडत नाही.माता जिजाऊ,महाराणी येसूबाई, ताराराणी, माता सावित्री यांचा इतिहास आपण आजच्या पिढीला, समस्त माता भगिनींना सांगत नाही तो पर्यत तो जगात पोहचणार नाही.आजच्या तरूणींनी ,महिलांनी हा इतिहास अभ्यासावा , माहिती करून घ्यावा यासाठी माझे प्रयत्न चालू असल्याचे त्यांनी सांगितले.

## वोट चोरी विरोधात ठाणे जिल्ह्यात स्वाक्षरी मोहीम - दयानंद चोरघे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

भिवंडी ( प्रतिनिधी ) देशात व राज्यात भारतीय जनता पक्षाने वोट चोरी करून सत्ता मिळवली असून या विरोधात राहुल गांधी यांनी "मतदार अधिकार यात्रा" करून जनजागृती केल्यानंतर वोट चोरी विरोधात काँग्रेस पक्षाने स्वाक्षरी मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला असून वोट चोरी विरोधातील दुसरा टप्पा सुरू केला आहे. राज्यात दिनांक 15 सप्टेंबर ते 15 ऑक्टोबर 2025 पर्यंत वोट चोरी विरोधात स्वाक्षरी मोहीम राबविण्याचे राष्ट्रीय काँग्रेसने आदेश दिले असून ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील सर्व ब्लॉगमध्ये स्वाक्षरी मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे दिली आहे.




ठाणे ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी प्रसार माध्यमांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या "मतदार अधिकार यात्रे" नंतर ब्लॉक मंडळ व बूथ स्तरावर जाऊन वोट चोरी संदर्भात स्वाक्षरी मोहीम राबवली जाणार आहे. ठाणे ग्रामीण अंतर्गत येणाऱ्या सर्व ब्लॉक अध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात आल्या असून बूथ व मंडळ स्तरावर जाऊन मत चोरी विरोधात जनजागृती करून स्वाक्षरी मोहीम राबवली जाणार आहे. सर्व ब्लॉक अध्यक्ष व सर्व आघाडी, विभाग व सेलचे प्रमुख पदाधिकारी जिल्हा, तालुका पदाधिकारी यांनी या मोहिमेत सक्रियपणे काम करून ठाणे ग्रामीण जिल्ह्यातून जास्तीत जास्त लोकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन चोरघे यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना केले आहे,तसेच संविधान व लोकशाहीवर विश्वास असलेल्या नागरिकांनी सुद्धा लोकशाही वाचविण्यासाठी या स्वाक्षरी मोहिमेत मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावे असे आवाहन ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे व प्रदेश युवा नेते विरेन चोरघे यांनी केले आहे.

## आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त
# समता सामाजिक फाऊंडेशन प्रकाशित 'वादळ' विशेषांकाचे प्रकाशन !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुरबाड * प्रतिनिधी**

समता सामाजिक फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य तर्फे आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त "वादळ" हा विशेष अंक प्रकाशित करण्यात येत आहे. या अंकामध्ये आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड विधानसभा क्षेत्रासाठी केलेल्या उल्लेखनीय विकासकामांचा आलेख, तसेच विविध मान्यवरांच्या शुभेच्छा प्रकाशित करण्यात आल्या आहेत.




समता सामाजिक फाउंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून समाजोपयोगी कार्य करीत आहे. विशेषतः विद्यार्थी वर्गासाठी शैक्षणिक मदतीचे उपक्रम राबवून फाउंडेशनने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी फाउंडेशनकडून विशेष अंक प्रकाशित करून त्यांना वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत या उपक्रमामध्ये फाउंडेशनचे अध्यक्ष शंकर करडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे फाउंडेशनचे पदाधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभते. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे आणि महाराष्ट्र प्रदेश संघटक नितीन शिंदे यांनी देखील आमदार किसन कथोरे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### मुरबाडच्या सर्वांगीण विकासाचा आलेख

- आमदार किसन कथोरे यांनी मागील काही वर्षांत मुरबाड तालुक्याचा विकास घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. यात –
- मुरबाड शहरातील रस्ते, पाणीपुरवठा व स्वच्छता प्रकल्पांना गती
- शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा, वसतिगृह प्रकल्प आणि क्रीडा साहित्य वाटप
- ग्रामीण भागातील सिंचन प्रकल्प, जलजीवन मिशनांतर्गत शुद्ध पाणी योजना
- आदिवासी व डोंगरी भागात आरोग्य शिबिरे, अंगणवाडी व शाळा दुरुस्ती कामे
- पर्यटनाला चालना देण्यासाठी माळशेज घाट चा कायापालट निसर्ग पर्यटन प्रकल्पांचा आराखडा
- मुरबाड शहरातील भव्य दिव्य अशा शासकीय इमारती मुरबाड शहरासाठी अत्यंत जीवत प्रश्न होता तो पाण्याचा पण आज महिला वर्गाच्या डोक्यावरील हंडा खरा उतरवला आहे तो आमदार कथोरे यांनीच त्यामुळे तालुक्यातील सर्व महिला आज आमदार किसन कथोरे यांचे आभार मानत आहेत
- आज मुरबाड पोलीस स्टेशन हे कोकण विभागात महाराष्ट्रात विभागात नंबर एक ने उभे आहे हे सर्व श्रेय आमदार किसन कथोरे यांनाच जाते
- मुरबाड– कल्याण ठाणे मालशेज घाट नगर पुणे रोड म्हसा कर्जत रोड जोडणाऱ्या रस्त्यांचे चौपदरीकरण आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार
- या कामांमुळे मुरबाड तालुक्याची ओळख केवळ ग्रामीण भागापुरती न राहता विकासाच्या नकाशावर ठळकपणे उमटली आहे. त्यामुळेच त्यांना संपूर्ण महाराष्ट्रात वादळ विकासाचे म्हणून संबोधले जाते
- समता सामाजिक फाऊंडेशन महाराष्ट्र प्रकाशित वादळ ह्या विशेष अंका चे प्रकाशन 19 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी साडेअकरा वाजता बदलापूर येथील आमदार किसन कथोरे यांच्या निवासस्थानी होणार आहे.

## इको फ्रेंडली गणेशोत्सव सजावट स्पर्धेत स्टार क्रिडा मंडळ प्रथम




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर :** इको फ्रेंडली गणेशोत्सव सजावट स्पर्धेत स्टार क्रिडा मंडळ वाणी आळी बदलापूर यांनी या स्पर्धेतील प्रथम पारितोषिक पटकावल्याची माहीती अविनाश (अ वी) पातकर यांनी दिली.

बदलापूर शहर भाजपाच्या वतिने या स्पर्धेचे आयोजन केले होते. गणेशोत्सव काळात अनेक सजावटीया साहित्य वापरून भव्यदिव्य वस्तू वापरून मोठ मोठे देखावे केले जातात. मात्र हे देखाव्यासाठी वापरेल्या साहित्या मुळे नैसर्गीक हानी मोठ्या प्रमाणात होत असते. याला आळा बसावा म्हणून व गणेशभक्तांची मानसिकता बदलून इको फ्रेंडली देखावे बनविण्यास कल व्हावा या द्रुष्टीने भाजपाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेला बदलापूरकरांनी मोठा प्रतिसादही दिला. बदलापूर येथील वाणीआळी येथील मंडळाने अनेक वर्ष सलग बक्षीसे पटकावल्याने या वर्षीही जोमाने या मंडळाने या स्पर्धेत भाग घेतला होता. देखावा बनविताना नैसर्गिक आपत्तीला बादा येईल अशा कोणत्याही वस्तू न वापरता जून्या काळात घरोघरी वापरली जाणारी व आता अडगळीत पडलेली तांब्या पितळेची भांडी वापरून सुदर देखावा बनविला होता.

जून्या तांब्या पितळेच्या भांड्यांची ओळख नसलेल्या तरूण गणेश भक्तांना या देखाव्याच्या माध्यमातून ती पूरी करता आल्याने तरूण गणेश भक्तांकडून हा देखावा पहाण्यासाठी सात दिवसात शेकडो भक्तांनी हजेरी लावल्याचे पहावयास मिळाले. परिक्षकांनी परीक्षण करून या मंडळाला प्रथम पारितोषीक देऊन गौरविण्यात आले.

## एमआयडीसी कडून पाणी दरवाढ नागरिकांमध्ये असंतोष

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** एमआयडीसीने पाणी दरात दर युनिट मागे एक ते पावणे तीन रुपयाने वाढ केल्याने त्याचा फटका महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला आणि उद्योगाला बसणार असून त्यामुळे मोठा असंतोष निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने परिपत्रक काढून दिनांक 01/09/2025 पासून महाराष्ट्रातील सर्व निवासी आणि औद्योगिक क्षेत्रासाठी पाणी दरात वाढ केल्याचे नमूद केले असून प्रती युनिट निवासी साठी एक रुपया, औद्योगिक साठी पावणेतीन रुपये अशी पाणी दरात वाढ झाली आहे. निवासीचा सद्याचा दर प्रती युनिट दर रुपये 8.25 असा आहे तो आता रुपये 9.25 होणार आहे. औद्योगिक साठी पाण्याचा दर रुपये 22.50 असा होता तो आता रुपये 25.25 प्रती युनिट असा होईल. औद्योगिक क्षेत्रात जे कच्चा माल करीता पाणी वापर करीत असतात त्यांना रुपये 28.25 इतकी प्रत्येकी युनिट मागे वाढ केली गेली आहे. त्यांचा पाण्याचा दर हा रुपये 85 ते 88 असा प्रती युनिट होईल.

हे परिपत्रक काल व आज स्थानिक डोंबिवली एमआयडीसी कार्यालय कडून देण्यात आले आहे. त्या परिपत्रकावर तारीख 11/09/2025 रोजीची आहे तर सर्व महाराष्ट्र साठी मुंबई येथील मुख्य कार्यालयातून काढण्यात आलेल्या परिपत्रक वर 09/09/2025 रोजीची तारीख आहे. परंतु पाणी दरवाढ ही 01/09/2025 पासून करण्यात आल्याने जनतेला गृहीत धरून ही दरवाढ केली असल्याचे दिसत आहे. त्यामुळे जनतेला ही दरवाढ बद्दल कोणतीही हरकत घेता येऊ नये असे एकंदरीत दिसते.

या दरवाढीतून एमआयडीसीला करोडो रुपये उत्पन्न अधिक मिळणार आहेत. गेल्या वर्षी एमआयडीसीला मोठा तोटा सहन करावा लागला होता. त्याची कारणे भ्रष्टाचार, भूखंड खरेदी विक्री वाटप मध्ये अनियमिता इत्यादी होता. परंतु हा तोटा भरून काढण्यासाठी पाणी, भूखंड, सेवा इत्यादी दरात वाढ करण्याशिवाय एमआयडीसी कडे पर्याय नव्हता. त्यामुळेच ही पाण्याची दरवाढ केली गेली आहे. भूखंड दर व इतर सेवेत पण यापुढे दरवाढ नक्की होणार.

एमआयडीसीने पाण्याची ही जाचक दरवाढ मागे घ्यावी नाहीतर येथील सर्व राजकीय पक्ष संघटना, रहिवाशी, सामाजिक, कारखानदार संघटना या प्रखर आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. येत्या महापालिकेच्या निवडणुकीच्या वेळी हा मुद्दा जनतेकडून आजी माजी लोकप्रतिनिधी, संभाव्य इच्छुक नगरसेवक उमेदवार, राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांना विचारला जाणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी दिली.

# गणेशमूर्ती विक्रीत महिलांची गरुडझेप
## रायगड जिल्ह्यात मूर्ती व्यवसायातून १३ कोटींची उलाढाल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**

उमेद अभियानांतर्गत गणपती मूर्ती व्यवसायात महिलांनी पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. बचत गटातील महिलांनी केल्या 1 लाख 66 हजार 833 गणपतीमूर्ती व्यवसायातून 13 कोटी 13 लाख 87 हजार 200 रुपयांची करण्यात आली आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी बचत गटातील महिलांना व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन केल्याने, जिल्ह्यातील महिला शक्ती गणपती मूर्ती व्यवसायात गरुड झेप घेऊ शकल्या आहेत.त्या कौतुकास्पद असल्याचे सांगण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, रेखीव डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना स्वतची खास ओळख प्राप्त झाली असून, गणपती मूर्तींना गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचतगट उतरले आहेत.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत पेण व जिल्ह्यातील इतर तालुक्यातील विविध बचत गटातील महिला या गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. महिला बचत गटांनी 1 लाख 66 हजार 833 गणपती मूर्ती तयार केल्या असून, यामधील 1 हजार 500 गणपती मूर्ती परदेशात पाठविण्यात आल्या आहेत. गणपती मूर्ती व्यवसायातून 13 कोटी 13 लाख 87 हजार 200 रुपयांची उलाढाल केली आहे. व्यवसायासाठी उमेद अभियानमार्फत महिला बचत गटांना फिरता निधी तसेच ग्राम संघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला असून, महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. या व्यवसायामुळे महिलांच्या हाताला काम मिळाल्यामुळे त्या अधिक सक्षम बनल्या आहेत.

अलिबाग तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 1 हजार 277 असून एकुण उलाढाल 8 लाख 15 हजार. कर्जत तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 3 हजार 450 असून एकूण उलाढाल 30 लाख 50 हजार. खालापूर तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 150 असून एकूण उलाढाल 2 लाख 30 हजार. महाड तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 320 असून एकूण उलाढाल 2 लाख 50 हजार. माणगाव तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 420 असून एकूण उलाढाल 3 लाख 45 हजार. म्हसळा तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 358 असून एकूण उलाढाल 2 लाख 96 हजार 500. मुरुड तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 650 असून एकूण उलाढाल 16 लाख 25 हजार. पनवेल तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 220 असून एकूण उलाढाल 6 लाख 45 हजार. पेण तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 1 लाख 58 हजार 102 असून एकूण उलाढाल 12 कोटी 21 लाख 95 हजार 700. पोलादपूर तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 135 असून एकूण उलाढाल 1 लाख 65 हजार. रोहा तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 98 असून एकूण उलाढाल 60 हजार. श्रीवर्धन तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 450 असून एकूण उलाढाल 6 लाख 65 हजार. सुधागड तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 100 असून एकूण उलाढाल 70 हजार. तळा तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 138 असून एकूण उलाढाल 2 लाख 60 हजार. उरण तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या 965 असून एकूण उलाढाल 7 लाख 15 हजार. अशा एकूण 1 लाख 66 हजार 833 विक्री केलेल्या मूर्तींची संख्या असून एकूण उलाढाल 13 कोटी 13 लाख 87 हजार 200 रुपयांची करण्यात आली आहे. जास्तीत जास्त महिलांनी या व्यवसायात सहभागी होवून या माध्यमातून उपजीविकेच्या नवनवीन संधी निर्माण होऊन महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024